**फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम २९९ प्रमाणे**

नि. फौ. मा. क्र. ७२६/२०१२

शासन –वि–राजाभाउ

निशाणी क्रं. १३

**सरकार तर्फे सा. क्र. १ यांची साक्ष**

नांव – धनंजय लालाजी शेकदार,

वय – ४२ धंदा – पोलीस हवालदार, ब. क्र. १०८२,

रा. सद्या नेमणुक पोलीस ठाणे वडगांव जंगल, यवतमाळ,

ता. जि. यवतमाळ.

**सरतपासणी श्रीमती सी. एस. खांडरे, सहा. सरकारी वकील मार्फत–**

दि. १९/०६/२०१२ रोजी माझी वडगांव रोड पोलीस ठाणे येथे स्टेशन डायरी अधिकारी म्हणून दिवसपाळी ड्यूटी होती. सौ. लक्ष्मी राजाभाउ पुरी हिला तिच्या पतीने मारहाण केल्यामुळे त्या दिवशी ती आमच्या पोलीस ठाण्यात तक्रार द्यायला आली होती. तिला मी वैद्यकिय तपासणीसाठी पाठविले. तिने वैद्यकिय प्रमाणपत्र हजर केल्यानंतर मी तिचा जबानी रिपोर्ट घेतला. आता मला वैद्यकिय प्रमाणपत्र दाखविण्यात आले. ते तेच आहे. त्याला **वस्तू क्र.–अ** दिला. आता मला जबानी रिपोर्ट दाखविण्यात आला. त्यावर ड्यूटी ऑफीसर इंगोले, तक्रारदार व माझी सही असून, त्यातील मजकूर बरोबर आहे. त्याला **नि. क्र. १४** देण्यात येते. आता मला छापील प्रथम खबर दाखविली. त्यावर माझी व तक्रारदाराची सही असून, त्यातील मजकूर बरोबर आहे. त्याला **नि. क्र. १५** देण्यात येते. त्यानंतर तपास दुसऱ्या अधिकाऱ्याकडे वर्ग करण्यात आला.

२. **उलटतपास आरोपीतर्फे** – आरोपीविरुध्द जाहीरनामा काढल्यामुळे तो हजर होईपर्यत उलटतपास तहकुब.

वा. दा. ब. अ. क. के.

माझे समक्ष

Digitally signed by ARCHANA MOHAN SHAH
Date: 2025.03.12 16:55:37 +0530

(श्रीमती अ. मो. शाह)
मुख्य न्यायदंडाधिकारी, यवतमाळ
दिनांक १२/०३/२०२५.

(श्रीमती अ. मो. शाह)
मुख्य न्यायदंडाधिकारी, यवतमाळ